# पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय

## कवठे महांकाळ, जि. सांगली

---

**अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत दि. २०/३/२०१२ रोजी "काव्यनिर्मिती प्रक्रिया" विषयावर संपन्न झालेल्या एक दिवशीय कार्यशाळेचा अहवाल**

मंगळवार दि. २०/३/२०१२ रोजी आमचे महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय अतंर्गत वरिष्ठ महाविद्यालयातील बी.ए. भाग-३ च्या विद्यार्थ्यांसाठी **"काव्यनिर्मिती प्रक्रिया"** या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये साधन व्यक्ती म्हणून **प्रा. डॉ. सूरज बाळासो चौगुले, हिंदी विभागप्रमुख, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द,** ता. वाळवा, जि. सांगली व **सुप्रसिध्द कवी श्री. प्रमोद मनोहर कोपर्डे, सातारा** यांना निमंत्रित केलेले होते. प्रथम सत्रात सुप्रसिध्द कवी मा. प्रमोद कोपर्डे यांनी काव्यनिर्मिती बद्दल विद्यार्थी व नवोदित कवींना मौलिक मार्गदर्शन केले. त्यांनी कविता कशी निर्माण होते, कविता कशी लिहिली जावी अशा विविध स्वरूपातून काव्यनिर्मितीचा सर्वांगीण विचार नवोदित कवी व विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट केला.

साधन व्यक्ती **प्रा. डॉ. सूरज बाळासो चौगुले** यांनीही कविता लेखनाबद्दल मौलिक विचार मांडून, विविध मराठी कवितांचा परामर्श घेवून आस्वादक भूमिका स्पष्ट केली. जेष्ठ समीक्षक प्रा. जी. के. ऐनापूरे यांनी समीक्षात्मक विचार मांडले आणि कवितेच्या स्वरूपाचा विचार व्यक्त केला.

द्वितीय सत्रात महाविद्यालयातील युवा कवी आणि कवठेमहांकाळ तालुक्यातील निमंत्रित कवींचे काव्यवाचन झाले. या काव्यवाचनात महाविद्यालयातील १० तसेच निमंत्रित १५ कवींनी सहभाग घेवून आपल्या कविता सादर केल्या.

शेवटी प्रा. आबासाहेब शिंदे यांनी आभार मानून कार्यशाळेचा समारोप केला.

समन्वयक

प्राचार्य,
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ जि सांगली

# पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय

## कवठे महांकाळ, जि. सांगली

**अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत दि. १०/१०/२०१५ रोजी "कथानिर्मिती प्रक्रिया" विषयावर संपन्न झालेल्या एक दिवशीय कार्यशाळेचा अहवाल**

शनिवार दि. १०/१०/२०१५ रोजी आमचे महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय अतंर्गत वरिष्ठ महाविद्यालयातील बी.ए. भाग-३ च्या विद्यार्थ्यांसाठी **"कथानिर्मिती"** या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

अग्रणी महाविद्यालय अंतर्गत असणा-या सावळज, सलगरे, जत आणि उमदी येथील वरिष्ठ महाविद्यालयातील १ प्राध्यापक व प्रत्येकी ५ विद्यार्थी असे एकूण २५ व आमचे महाविद्यालयातील ८९ मिळून ११४ विद्यार्थी, प्राध्यापक सदर कार्यशाळेत सहभागी झाले होते.

सकाळी ९.०० ते ९.३० वेळेत नोंदणी होवून १०.०० वा. उद्घाटन झाले. यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. बळवंत जेऊरकर यांनी हिंदी आणि मराठीतील अनेक कथांची उदाहरणे देवून कथानिर्मितीची प्रक्रिया मांडली. प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांनी कथेसंबंधी सविस्तर माहिती सांगितली.

दुस-या सत्रात जेष्ठ समीक्षक जी.के. ऐनापुरे यांनी कथालेखनाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि स्वत:च्या कथानिर्मितीबद्दल माहिती सांगितली. आप्पासाहेब कोळेकर यांनी मंटोच्या कथेचे वाचन केले तर प्रा. नंदकुमार भगत यांनी मराठी कथेच्या उदयापासून कथावाङ्मयाचा आढावा घेतला. सदरच्या कार्यशाळेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले. साधन व्यक्तींनी त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. कथानिर्मितीबद्दल सविस्तर चर्चा झाली.

आदरणीय प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांचे सहकार्य आणि मार्गदर्शनाने सदरची कार्यशाळा यशस्वी झाली. स्वागत, प्रास्ताविक व भूमिका प्रा. मोहन लोंढे यांनी कले तर संयोजन प्रा. आप्पासो कोळैकर यांनी केले. शेवटी आभार लोमेश कोळेकर यांनी मानले.

समन्वयक

प्राचार्य

**PRINCIPAL,**
Padmabhushan Vasantraodada Patil
Mahavidyalaya,K.Mahankal,Dist-Sangli